ISSN2249-894X Impact Factor :3.1402 (UIF) Volume- 5 |Issue- 11 |August - 2016

Review Of Research

# स्वातंत्र्योत्तर मराठी चरित्रे: व्यक्तिविमर्श, संकल्पना व स्वरुप

डॉ. डी.आर गायकवाड
मराठी विभाग , सहयोगी प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक
द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय,
सोलापूर .

## प्रस्तावना:

कथा, कविता, कादंबरी, नाटक व चरित्र- आत्मचरित्र हे मराठीतील महत्वाचे साहित्यप्रकार होय. अन्य साहित्य प्रकारांप्रमाणेच मराठी चरित्रलेखनालाही प्राचीन, समृध्द-संपन्न व अखंड परंपरा लाभली आहे. वैविध्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण लेखनाची परंपरा लाभलेल्या मराठी चरित्रवाङ्मयाचे अभ्यासाच्या सोयीसाठी स्वातंत्र्यपूर्व व स्वातत्र्योत्तर आशा दोन भागात विभाजन करता येणे शक्य आहे. प्रस्तुत शोधनिबंधात स्वातंत्र्योत्तर कालखंडातील काही महत्वाच्या चरित्रकारांच्या चरित्रांच्या आधारे केवळ 'व्यक्तिविर्शत्मक' चरित्रांचा अभ्यास अपेक्षित आहे. तुलनात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करुन हा अभ्यास करण्याचे नियोजन आहे. चरित्र स्वरुप-संकल्पना स्पष्ट करणाऱ्या विविध व्याख्या उपलब्ध आहेत. तथापि 'चरित्र म्हणजे एका माणसाच्या जीवनाचा वृतांत सांगणारी कलाकृती होय' ही चरित्रचिंतक डॉ.द.न.गोखले यांची व्याख्या सर्वसमावेशक ठरते.

गं.दे.खानोलकर, न.र.फाटक डॉ. धनंजय कीर, डॉ.द.न. गोखले, डॉ.य.दि. फडके, चां.भ.खैरमोडे, वा.सी. बेंद्रे, वि.भि. कोलते स्मृती देवस्थळी, वीणा गवाणकर व म.श्री. दिक्षित हे स्वातंत्र्योत्तर काळाखंडातील कांही व्रतस्थ चरित्रकार होय. या चरित्रकारांनी आपल्या परिश्रमाला संशोधनाला चरित्राचिंतनाची जोड दिली. आपल्या चरित्रलेखनात नवनवे प्रयोग केले. चरित्र लेखनांचा आत्मा असणारे 'सत्य' मांडता-मांडता मनुष्य समजून घेता-घेता इतिहासाबरोबरच साहित्यप्रधान स्वरुपाचा शोध घेत घेत आपल्या चरित्र नायकास 'सजीव' केले. परिणामी त्यांच्या या कामगिरीमुळे मराठीतले चरित्र दालन सर्वार्थाने व सर्वांगाने समृध्द झाले. मराठी चरित्रलेखनात 'व्यक्तिविमर्श' चरित्रलेखनाची एक नवी लेखन पध्दती त्यांच्यामुळे रुढ झाली.

## चरित्रकार आणि व्यक्तिविमर्शक:-

चरित्र ग्रंथांचे वाचक, अभ्यासक आणि त्यास आनंद-विषय मानणारे रसिक जाणकार यांच्या मनात एक प्रयोगशील, साक्षेपी आणि मर्मज्ञ चरित्रकार म्हणून डॉ. द. न. गोखले यांना आदराचे व मानाचे स्थान आहे. ते जसे व्रतस्थ चरित्रकार, चरित्रचिंतक होते तसेच व्यक्तिविमर्शकही होते. मराठी 'चरित्रा'च्या दीर्घ परंपरेत व विकासाच्या स्वातंत्र्योत्तर काळातल्या आजवरच्या वाटचालीतल्या जवळ जवळ प्रत्येक महत्वाच्या टप्प्यांवर गोखले यांचा चरित्र ग्रंथ भेटतो. तो काहीतरी नवे सांगणारा, नव्या मांडणीचा आणि वाचकांना परंपरेपेक्षा वेगळा विचार करुन चरित्रनायकाप्रत नेणारा असतो. हे डॉ. द. न. गोखले यांचे वैशिष्ट होते.

गोखले यांचे चरित्र ग्रंथ मोजकेच आहेत. पण एखादा चरित्रनायक त्याच्या अंतरंगात शिरुर कसा समजून घ्यावा हे दाखवणारे व चरित्रकाराने त्या दृष्टीने प्रयत्न कसे करायचे असतात याचा जणू वस्तुपाठ देणारे आहेत. म्हणूनच पुढच्या काळात ते केवळ चरित्रकार राहत नाहीत तर नव्या चरित्रलेखन प्रक्रियेच्या साह्याने अधिक सूक्ष्मात जाणरे व नवाच 'व्यक्तिविमर्श म्हणजे व्यक्तित्वाचा' विचार हा वाङ्मयप्रकार निर्मिणारे 'व्यक्तिविमर्शक' ठरतात.

चरित्रनायकाकडे प्रारंभी निखळ वास्तव दृष्टीने पाहणारे व मनोवैज्ञानिक कल्पकतेच्या आधाराने सूक्ष्म व्यक्तित्वविश्लेषणात शिरणारे डॉ. गोखले जेव्हा चरित्रापेक्षा काहीतरी वेगळे मांडण्याच्या प्रयत्नात 'उत्तम' चरित्राचे तत्कालीन मापदंड ओलांडत त्यापलीकडचे लेखन करु लागले तेव्हा कदाचित त्या विशिष्ट मानसिकतेत त्या परिस्थितीने त्यांना ते म्हणतात तसे 'व्यक्तिविमर्शा' कडे आणून सोडले असेल. पण परिणामी 'व्यक्तिविमर्श' लेखनास, नवचरित्रास, सुरुवात झाली. हे चरित्रलेखनाच्या दृष्टीने स्वागतार्द ठरले.

आपल्या 'डॉ. केतकर' या चरित्रातून लेखनाची नवी वाट चोखाळत पण व्यक्तित्व आणि जीवन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे न विसरता गोखले 'सत्या'च्या जवळ जात होते. 'काळ आणि कर्तृत्वा' पलीकडे जाऊन चरित्रनायकास वास्तवाधारे 'सजीव' करत होते. नंतरच्या काळात जिज्ञासा आणि आरपार व्यक्तिमत्व जाणून घेण्यासाठीचा प्रयत्न करणारा त्यांच्यातला सृजनशील चरित्रकार माधवराव पटवर्धनांच्या बाबतीत बुद्धिपूर्वक मनोवैज्ञानिक कल्पकतेचा वापर करत होता. गूढ आणि तरल व्यक्तिमत्त्वाचा शोध घेत विश्लेषण करत होता.पण या सर्व अभ्यासापलीकडचे नवी पध्दती शोधायला भाग पाडणारे, चिंतनप्रक्रियेस आव्हान देत पुढे येणारे चरित्रनायकच कदाचित त्यांना 'व्यक्तिविमर्शा'प्रत नेत असावेत. व्यक्तिमत्त्वाचे मूळ स्त्रोत शोधण्याच्या प्रक्रियेतला तो आवश्यक असा पुढचा टप्पा असावा.

'सावरकर : एक रहस्य' हा चरित्र ग्रंथ लिहिताना आणि त्यातुन सावरकर रहस्य उलगडताना डॉ. गोखले नेहमीपेक्षाही काहीतरी वेगळाच प्रयोग करताना दिसतात.

'महात्मा गांधी : मानव नि महामानव' या आपल्या पुढच्या व्यक्तिविमर्शात त्यांनी आत्मनिवेदनाच्या रुपात नोदवली. यामुळे 'व्यक्तिविमर्श' समजण्यास वाचकांना निश्चितच मदत होते.

**'व्यक्तिविमर्श' : संकल्पना व स्वरुपः-**

चरित्र आणि व्यक्तिविमर्श हे दोन वेगवेगळे वाङ्मयप्रकार मानावे, काही बाबतीत या दोन्हींत साम्य आढळले तरीही ती वेगळी वाङ्मय शाखा मानावी, अशी डॉ. द. न. गोखले यांची भूमिका होती. व्यक्तिविमर्शात व्यक्ती आणि तिच्या भोवतालचा परिसर किंवा तिच्या भोवती केंदित होणारा सत्याच्या रुपातला आशय हे वास्तव असते. त्यात कल्पिताचे मिश्रण होऊ देऊ नये; तसे केल्यास व्यक्तिविमर्शात हीण येईल; याची जाणीव करुन देतानाच हे दोन्हीही वाङ्मयप्रकार शुध्द वास्तवाशी संबंधित असल्याने त्याचा शोध शास्त्रानुसार घ्यावा लागतो. चरित्रनायकाभोवती लपेटलेले वास्तव लक्षात घेत तेथे विमर्शक आपापल्या (स्वतःच्या) स्वभावानुसार त्याचे विवेचन करतो. हे लेखन व्यक्तिकेंद्रित असल्याने त्यात प्रसंगानुसार मानसशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र मानववंशशास्त्र आदी मानव संबंधित शाखांचा उपयोग तो करतो; पण तो त्याचा प्रधान उद्देश नसल्याने तेथे एक सहज परिणाम साधला जात असतो.

चरित्रात घटना-प्रसंगांवर भर असतो, तर व्यक्तिविमर्शात त्यावर जास्त भर नसतो; किंवा ते त्याचे प्रमुख साधनही नसते. तर घटनांचा आधार घेऊन त्यात व्यक्तित्वावर, मनावर आणि स्वभावदर्शनावर अधिक भर असतो. परिणामी विवेचन आणि विश्लेषण महत्त्वचे ठरते व या स्वभाव, मन वा व्यक्तित्वाचेच 'स्पष्ट'आणि 'प्रत्यक्ष' विवेचन हेच त्याचे उद्देश असते व तेवढ्यापुरता तो इतर ज्ञानशखांची मदत घेतो. या अर्थाने चरित्राच्या तुलनेत कलेपेक्ष व्यक्तिविमर्श शास्त्राला अधिक जवळचा असतो, हे गोखले आवर्जून सांगतात. व्यक्तिविमर्शात त्यांना शब्दयोजनेचा काटेकोरपणा अपेक्षित आहे; ती मुख्यार्थदर्शक असावी हा त्यामागचा हेतू आहे.

व्यक्तिविमर्शकाची मानसिक प्रक्रिया वेगळी, म्हणजे चरित्रकारापेक्षा वेगळी असल्याचे सांगतानाच तेथे दर्शनापेक्षा विश्लेषणास महत्त्व असल्याचे ते मांडतात. वाचकांना अनुभव देण्यापेक्षा त्यांच्या बुध्दीला पटवण्याकडेच विमर्शकाचे लक्ष अधिक असते. त्यासाठी ते त्याच्या स्वतःच्या बुध्दीला पटवून घेणे येथे गृहीत आहे. व्यक्तिविमर्शात कदाचित यामुळेच 'प्रतिभे'पेक्षा 'प्रज्ञे'चा (उच्चतम बुध्दीचा) उपयोग गोखले अधिक महत्वाचा मानताना दिसतात.

मानवी मनात अनेक प्रकारची गुंतागुंत असते. त्यांना दूर करण्याचे काम सत्याचा शोध घेताना जसे शास्त्रे करतात तसेच व्यक्तिमनाचा तळ हुडकत व्यक्तित्वाचा शोध 'व्यक्तिविमर्शक' घेतो. तेवढ्यापूरता तो 'सत्यशोधक' असल्याने तो शास्त्र असतो. तेथे कलेच्या मागण्यांबरोबरच शस्त्राच्या अपेक्षाही व्यक्तिविमर्शकाला पूर्ण करायच्या असतात. शास्त्रानुसार सत्यशोधन करता करता वाचकांना कलेचा आनंदही घ्यायचा असतो. त्याशिवाय 'व्यक्तिविमर्श' यशस्वी आणि दर्जेदार होत नाही. डॉ.द.न. गोखलेंसह स्वातंत्र्योत्तर वर उल्लेखिलेल्या बहुतांश चरित्रकारांनी आपल्या चरित्र निमित्तीत याचे चांगले भान बाळगल्याचे दिसते.

चरित्रनायकाच्या भूमिकेत जात जात त्याच्या मनात उतरत उद्‌भवणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाऊन व्यक्तिविमर्शकाने व्यक्तित्व समजावून घेणे यांना महत्त्वाचे वाटते. त्यात नुसती टीका वा कोरडी समीक्षा न करता चरित्रनायकाच्या क्रिया-प्रतिक्रियांचा मानसशास्त्राच्या दृष्टीने उलगडा करत त्याने मूल्यमापनाकडे यायचे असते. त्यासाठी चरित्रनायकाशी समरस होऊन त्याला अधिकधिक समजून घेत व्यक्तित्वाच्या गाभ्यात प्रवेश करण्याची जबाबदारी चरित्रकाराप्रमाणेच व्यक्तिविमर्शकावरही पडते. तसे हे चरित्रकार करताना आढळतात.

चरित्र आणि व्यक्तिविमर्श हे दोन्ही वाङ्मयप्रकार परस्परांना पूरक आणि पोषक आहेत, हे प्रतिपादन करताना दोन्हींत चरित्रनायकाच्या जीवनातील सर्व महत्त्वाच्या घटनांतून त्याचे व्यक्तित्वच मध्यवर्ती म्हणुन प्रतिबिंबित व्हायला हवे, हे ते सांगतात. व्यक्तिविमर्श प्रथम विमर्शकाच्या मनात पूर्ण होताना त्यात चरित्रनायकाचे हुबेहुब, पृथगात्म प्रतिबिंब उमटताना म्हणजेच व्यक्तित्वाचे घटक निवडताना विमर्शकाला त्याच्या सर्व मानसिक प्रक्रियांतुन जावे लागले. प्रत्येक घटकाचे संयोग-वियोग कसकसे होतात, ते निश्चित करतानाच ते घटक कुठे व कसे वैशिष्टयपूर्ण वा पृथगात्म आहेत, हेही जाणून घ्यावे लागते. उपलब्ध घटनांची वास्तवाच्या निकषांवर निवड करुन किंवा त्या पाखडून घेतल्यावरच व्यक्तिविमर्शकाला चरित्रनायकाचे खरेखुरे, वेगळे व्यक्तित्व दिसू लागले व त्याची परस्पर नातीगोती संदर्भासह शोधल्यानंतर स्वतःच्या मनःपटलावर उमटलेल्या आणि भावलेल्या व्यक्तित्वाचे वेगळे दर्शन वाचकांना घडवण्याचा प्रयोग व्यक्तिविमर्शक करतो. त्या दृष्टीनेदी हे चरिलेखक यशस्वी ठरताना दिसतात.

या मानसिक प्रक्रियेच्या परस्परावलंबनातून व्यक्तिविमर्शातील घटनांच्या निवेदनाचा प्रश्न निर्माण होतो. या शारीरिक, मानसिक वा इतरही घटनांतील मूलद्रव्ये व्यक्तित्वाच्या विश्लेषणातून त्यांचे संयोग-वियोग लक्षात घेत पहिली जातात. या घटनांच्या वर्णनातून असे लक्षात येते की, एकेका घटनेत व्यक्तित्वाचे अनेक घटक प्रतिबिंबित होतात. मग ती त्या त्या घटकाच्या निमित्ताने पुन्हा पुन्हा निवेदण्याचा प्रसंग येतो. अशी पुनरुक्ती बऱ्याचदा अपरिहार्य असली तरी ती शक्यतो टाळावी व ते निवेदन अधिक चातुर्याने करावे. मात्र अशा अपरिहार्य पुनरुक्तीस वाचकांनी व्यक्तिविमर्शाचा दोष न मानता ते ते घटक समजून घ्यवेत. तेथे विमर्शकाच्या भूमिकेत शिरुर त्याच्याइतकेच समरस होत चरित्रनायक समजून घेऊन त्यांची मांडणी करतात.

या निमित्तने स्वतःची 'व्यक्तित्त्वा'ची कल्पना सांगताना गोखले म्हणतात, "साधारणतः अशी एक रीत पडलेली आहे, की माणसाच्या शारिरीक ठेवणीत नि त्याच्या पोशाखातल्या पध्दतीत त्याच्या व्यक्तित्वाचा आविष्कार बघावा. त्याचे घरातले वागणे, त्याच्या लकबी, त्याचे घरगुती प्रसंगातले बोलणे-चालणे वगैरे गोष्टी त्याच्या व्यक्तित्वात घालाव्या ... मी हा (व्यक्तित्वचा) परीघ फारच व्यापक समजतो. मनुष्याच्या प्रत्येक हालचालीत, त्याच्या लहानमोठया प्रतिक्रियेत त्याचे व्यक्तित्व प्रकट होते असे मी मानतो. अर्थात ते दर्शनात असते, सगळ्या वागण्यात

असते, त्याच्या भावभावनात असते, विचारातही असते. ते जेवढे स्थूल, तेवढे सूक्ष्म असते, जेवढे स्थिर तेवढे प्रवाही असते, अनेकरुप असते, जेवढे वर्तमानकालीन, तेवढे भूतकालीन आणि भविष्यकालीनही असते" ('आंबेडकांराचे अंतरंग' प्रस्तावना पृष्ठ एकोणीस). व्यक्तिविमर्शात व्यक्तीमधील एकरुपता आणि सातत्याबरोबरच तीममधील विकास आणि परिवर्तनेही गोखले यांच्या मते बघावी लागतात.

व्यक्तिविमर्शात म्हणजे व्यक्तित्वविचारात त्याचे त्याच्या मूलद्रव्यात पृथक्करण करता करत ती मूलद्रव्ये कशी कमी- जास्त सबल वा दुर्बल आहेत ते मांडायचे व्यक्तित्वाची घडणही स्पष्ट करायची असते. म्हणजेच व्यक्तिविमर्शात व्यक्तित्वाचे स्वरुपाविष्करण असते. प्रेम, द्वेष, विचार, निष्ठा, प्रामाणिकपणा, धूर्तपणा, प्रतिभा, बुध्दिमता, कौशल्य, आळस, भिती, निष्ठुरता आदी अनेक मूलद्रव्ये व्यक्तित्वात येतात आणि या मूलद्रव्यांचे मिश्रण, मूलद्रव्ये कमी जास्त होत होत कालप्रदेशात वाहत जातात. या सर्वांच्या अभूतपूर्व मिश्रणातून सांगणे व ते ते वैशिष्ट्ये दाखविणारी त्यांची मिश्रणे हुडकणे हे गोखले यांच्या मते व्यक्तिविमर्शाचे उद्दिष्ट आहे.

ही मूलद्रव्ये बव्हंशी सामान्य माणसाच्या सामान्य जीवनातील आहेत आणि व्यक्तिविमर्श माणसाच्याच व्यक्तित्वासंबंधी असला, तो माणसाच्या मनाशी जोडलेला असला तरी तो सर्वस्वी मानसशास्त्रावर अवलंबून नाही. शास्त्राप्रमाणेच साहित्यही माणसाचे मन आणि वर्तन धुंडाळ्याचे काम त्याही पूर्वीपासून करत आहे आणि त्याचे काम अधिक कसोशीने, बारकाव्याने आणि हळुवारपणे होते आहे, हे साहित्यातील दिग्गजांच्या साहित्यकृतींवरुन लक्षात घ्यावे. तेंव्हा मानसशास्त्राप्रमाणेच साहित्य - शास्त्राकडूनही व्यक्तिविमर्श उसनवारी करतच असतो. समोरच्या जिज्ञासू, सूज्ञ व रसिक वाचकांसाठी चरित्रनायकांचे व्यक्तित्व उलगडून दाखवणे हेच त्याचे काम असल्याने मानसशास्त्र, सहित्यशास्त्र यांसह नित्य व्यहारतील ज्ञानाचीही मदत घेतो हे डॉ.गोखले यांनी आवर्जून सांगितले आहे. प्रसंगी ही शास्त्रेही व्यक्तित्व उलगडण्यास कशी अपुरी पडतात, त्यांच्यातील विविध मते (स्कूल्स) तेथे माणूस समजण्याचा केवळ प्रयत्नच करत असतात हे स्वानुभवावरुन गांधी-सावकरांसारख्या चरित्रनायकांच्या अभ्यासातून ते सांगताना दिसतात.

साग्रसंगीत वर्णन करत न बसता व्यक्तिविमर्शात व्यक्तित्वाचे वैशिष्टये म्हणजे इतरांहून जाणवणारा वेगळेपणाच तेवढा सांगायचा असतो. त्यासाठी कामसू, आळशी, आशावादी-निराशवादी अशा जोड्या वापरता येतात. पण कोणाचेही असे कायमचे वर्ग पडता येत नाहीत. शिवाय ते प्रेरणा दाखवत नाहीत तर प्रवणता दर्शवितात. व्यक्तित्वाचा एकंदर कल लक्षात येण्यासाठी त्या उपयुक्त ठरतात. प्रेरणेत कृती घडणारी तसेच आतून लोटणारी शक्ती असते. ती प्रवणतेत नसते हे गोखले यांचे प्रतिपादन आहे.

व्यक्तिविमर्श सत्य शोधणारा असल्याने तो शास्त्राच्या प्रदेशात येतो, तसाच तो कलेच्याही प्रदेशात येतो हे अधिक स्पष्ट करण्याच्या निमित्ताने व्यक्तिविमर्श चरित्राला आणि चरित्र कलेला समांतर असल्याने व्यक्तिविमर्श कलेलाही समांतर असणार, हे ओघानेच येते. याचे विवेचनही गोखले येथेच करतात. त्यातही विश्लेषणाचे, व्यक्तित्वाच्या मूलद्रव्यांचे व त्यांच्या संयोग-वियोगाचे साधन वापरत असल्याने व्यक्तिविमर्शाचा कल अनुभवापेक्षा 'ज्ञान' देण्याकडेच असतो. परिणामी 'अनुभवा' वरील, त्या रसमय प्रक्रियेवरील त्याची पकड ढिली होते आणि चरित्राच्या तुलनेत सौंदर्यानुभवात व्यक्तिविमर्श थोडासा उणा ठरतो आणि म्हणूनच चरित्राच्या मानाने तो कलेपासून थोडा दूर जातो, असे गोखले आपल्या विवेचनातून स्पष्ट करताना दिसतात.

व्यक्तित्वाचा अर्थ लावून, त्याचे विश्लेषण करुन ते उलगडून दाखवण्याच्या निमित्ताने मूल्यमापनही करणारी तुलनेने नवी लेखनप्रक्रिया या अर्थाने व्यक्तिविमर्श हा चरिचपेक्षा वरचढ आहे. त्यात हे सर्व स्पष्ट, प्रत्यक्ष आणि उघडपणे केलेले असते.

हा व्यक्तिविमर्शाचा विचार मनात घोळवत जेव्हा डॉ.द.न.गोखले यांनी तीन वेगवेगळे लेखनप्रयोग केले तेंव्हा त्यांच्या मनात मराठीच काय पण कोणत्याही अन्य भाषेतील मांडणीचा आदर्श नव्हता. ते त्या दिशेने प्रयोग करुन पाहत होते. तेंव्हा त्यांनी व्यक्तिविमर्श कसा मांडावा याचे निणर्य स्वातंत्र्यही विमर्शकाकडेच असावे असे म्हटले आहे. मात्र या साहित्यप्रकारात सत्याच्या शोधाबरोबरच सौंदर्यही त्याने जपले पाहिजे, असे अवर्जून सांगितले आहे. स्वातंत्र्योत्तर चरित्रकारांनी याचे चांगले भान बाळगले आहे.

शास्त्र सांभाळत कलाविष्कारही केला पाहिजे. साहजिकच यासाठी आशय आणि मांडणी दोन्हींतही व्यक्तिजीवनातील आशयाची अंगभूत सौंदर्यदृष्टी जपली पाहिजे. साहित्यकलेला जसे या अंगभूत सौंदर्याच्या जोडीला मांडणी वा अभिव्यक्तीचेही सौंदर्य लागते तसेच आशय नुसता बुध्दीला कळला तरी शास्त्राचे सार्थक होते. तेथे शास्त्र आशयाचे बौध्दिक आकलन घडवते, तर तो पंचेंद्रियांच्या अनुभवास येताच कलाही संतोष पावते. हा आशय सर्वार्थाने 'इंद्रिभोग्य' होण्यासाठी तो तपशिलाने सत्कार करत 'सजीव' करावा लागतो. आस्वाद्यमान होता होता तो आपोआपच जिभेवर विरघळतो. ' व्यक्तिविमर्शकार' प्रतिभासंपन्न कालवंत हवा तो या प्रक्रियेसाठी असे डॉ. गोखले यांचे या तीन प्रयोगानंतरचे निरीक्षण आहे.

### व्यक्तिविमर्शाचे तीन वेगवेगळे प्रयोग:-

चरित्रास अधिक सूक्ष्म अभ्यासाद्वारे पुढे नेणाऱ्या या वाङ्मयप्रकाराविषयीच्या रुपाचा काहीसा अंदाज बांधल्यावर आता या संकल्पनेचा प्रयोग डॉ.द.न. गोखले यांनी आपल्या चरित्रनिमित्ती कसा केला हे थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडाता येईल. सन १९८९ साली त्यांचा ' सावरकर : एक रहस्य' हा व्यक्तिविमर्शाचा पहिला प्रयत्न प्रकाशित झाला. यात सावरकरांच्या व्यक्तित्वातील ऐकक अंशाचा स्वतंत्र वेध लेखरुपात घेत त्याला सलगपणे एकत्र गुंफले. या प्रयोगात प्रत्येक लेखात सावरकरांच्या व्यक्तित्वाच्या वेगवेगळया अंगांवर लक्ष केंद्रित केल्याने पूर्ण व्यक्तित्वाकडे जाणीवपूर्वक वेगळे लक्ष देण्याचा प्रसंग त्यांच्यासमोर आला नाही.

गोखले यांनी पुढचा प्रयोग त्यांनी गांधीजी: मानव नि महामानव या व्यक्तिविमर्शात केला आहे. गांधीजींच्या व्यक्तित्वाचे विश्लेषण करुन त्याचे घटक गौण - प्राधान्य ठरवले व विशिष्ट घटकांना प्राधान्य देत व्यक्तिविमार्शाचे शब्दांकन केले आहे. हा प्रयोग त्यांच्या मते प्रत्यक्ष वा विशुध्द व्यक्तिविमर्शांचा नमुना ठरवा असा होता. या ग्रंथाच्या प्रस्तावनेतून त्यांनी या वाङ्मयप्रकाराच्या वैशिष्ट्यांचेही विवेचन केले आहे.

त्यांच्या तिसऱ्या 'डॉ. आंबेडकरांचे अंतरंग' या व्यक्तिविमर्शाच्या प्रयोगाचे मुद्रितरुप ते पाहू शकले नाहीत. या ग्रंथात त्यांनी निवेदनपध्दती चरित्राचीच म्हणजे कालानुसारी स्वीकारली. व्यक्तित्वाचे एकेक अंग वा अंगाचा समूह निवेदनासाठी न घेता कालानुसारी निवेदनातूच संपूर्ण व्यक्तित्व रेखाटण्याचा हा प्रयोग काहीसा अवघड होता. या आंबेडकरांच्या व्यक्तित्व लेखनाच्या प्रयोगात व्यक्तित्वावर लक्ष केंद्रित करत ते लिहिले गेले आहेत. 'व्यक्तिविमर्शच्या' दृष्टीने हा प्रयोग यशस्वी ठरल्याचा दिसतो.

पण चरित्रनायक आणि व्यक्तिविमर्शक यांची पातळी चरित्रकारांप्रमाणेच वाचकांनीही गाठावी, एका वाचन उंचीवर यावे असे गोखले यांचे अभ्यासक- वाचकांना आवाहन होते. तेथे वाचकांचे बौध्दिक सहकार्य अपेक्षित आहे. ते म्हणता की, " पुस्तकाचे वाचन नि ग्रहण म्हणजे लेखक, वर्ण्यविषय नि वाचक यांचे मीलन असते. हे मीलन उभयपक्षी सुखकारक होण्यासाठी लेखकाप्रमाणे वाचकांचीही पूर्वसिध्दता हवी. नायकाएवढे जसे लेखकाने उंच झाले पाहिजे, तसे वाचकानेही उंच झाले पाहिजे. व्यक्तिविमर्शातील सूक्ष्म, अवघड, पुसट विचार समजण्यासाठी त्यांची ग्रहणशक्ती आणि प्रगल्भता विकसित झाली पाहिजे. मुळातले विचार लेखकाने जरी आकलनसुलभ नि आस्वाद्य केले असले तरी त्यांची चव घेण्यासाठी वाचकाजवळ जीभ पाहिजे. मुळातल्या भावना कितीही हलक्याफुलक्या, फुंकरीने विस्कटण्याएवढ्या मुलायम असल्या नि त्यांचा कितीही हळुवार शब्दांनी लेखकाने आविष्कार केला असला, तरी त्यांच्याविषयी अभिज्ञता दाखविण्यासाठी रसिकता वाचकांच्या ठिकाणी हवी" (डॉ. आंबेडकरांचे अंतरंग, प्रस्तावना, पृष्ठ पत्तीस-छत्तीस)

एक व्यक्तिविमर्शक वा मराठीत हा वाङ्मयप्रकार जाणीवपूर्वक हाताळणारा पहिला व्यक्तिविमर्शक या नात्याने डॉ. द.न.गोखले यांनी वाचकांविषयी अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. स्वतःच्या वकुबानुसार तीन प्रयोगही सैध्दान्तिक विवेचनासह त्यांच्या समोर ठेवले आहेत. यातून त्यांच्यातला चरित्रकार कालैघात व्यक्तिविमर्शक म्हणून कसा विकास पावत गेला हे लक्षात येते. हा प्रयोग पुढे किती प्रमाणात ग्रंथरुपात वाङ्मयप्रकार म्हणून टिकेल वा विकास पावत गेल्याचा दिसतो. त्याने नव्या शास्त्र- कलेसह वावरणाऱ्या मराठीतल्या सूक्ष्म व्यक्तित्व विवेचन - विश्लेषणास गती दिली एवढे डॉ.गोखले यांचे स्थान या वाङ्मयप्रकाराचे वाचक नक्कीच स्मरतील. गोखले यांचे हे कार्य मराठी चरित्र लेखन विकासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले आहे. या त्यांच्या 'व्यक्तिविमर्श' चरित्र लेखनाचे तंत्र व कला स्वातंत्र्योत्तर महत्वाच्या चरित्रकारांनीही सांभाळल्याची आढळते. परिणामी चरित्रलेखन हा प्रकार समृध्द झाला.

**थोडक्यात** स्वातंत्र्योत्तर काळात अन्य वाङ्मय प्रकाराप्रमाणेच चरित्रलेखनातही विविधांगाने बदल झाले आहेत. 'सत्यपूर्ण कलात्मक व्यक्तीदर्शन' घडविण्यावर या काळातील लेखकांचा विशेष भर असल्याचा दिसतो. व्रतस्थ चरित्रकार गोखले यांच्या 'व्यक्तिविमर्श' चरित्र लेखन पध्दतीचा आवलंब बहुतांश चरित्रकारांनी केल्याचा दिसून येतो. 'व्यक्तीविमर्श' या संकल्पनेनुसार या काळातील चरित्र लेखनाचा स्वतंत्रपणे विचार होणे आवश्यक आहे असे वाटते. चरित्रे-आत्मचरित्रे वाचनाची व अभ्यासाची आवड असणारा समाज अधिक प्रगल्भ असतो असे मानले जाते. संशोधक-अभ्यासकांने त्या दृष्टीने प्रयत्न केल्यास चरित्र वाङ्मय प्रकाराच्या विकासाला निश्चतच गती येईल असे वाटते.

## संदर्भः-

१) चरित्र-आत्मचरित्र, प्रा.अ.म.जोशी, स्नेहवर्धन पविलशिंग हाऊस पुणे. चतुर्थ आवृत्ती २६ जानेवारी २००७
२) मराठी चरित्रः रुप आणि इतिहास जयंत वष्ट पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती ३ ऑक्टोबर २००९
३) ललित चरित्रे-आत्मचरित्रे विशेषांक जून-जुलै २०१३